online 2020-21

124

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

October - 2020

SPECIAL ISSUE - CCXLVIII-(248)

# Ideology of Mahatma Gandhi

Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Gest Editor:
Dr. R.K.Ippar
Principal
Vaidyanath College Parli- Vaijnath,
Dist. Beed.

Dr. B.K. Shep,
Head, Dept. of History

Dr. R.D. Rathod,
Head, Dept. of Sociology

Prof.(Dr.) V.B. Gaikwad
P.G. Coordinator, Science

Executive Editor:
Jawahar Education Society's Vaidyanath College Parli- Vaijnath,
Dist. Beed.

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Scanned with CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308 | October,2020
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO. 248

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

*Multidisciplinary International Research Journal*

October - 2020

SPECIAL ISSUE - CCXLVIII ( 248)

## Ideology of Mahatma Gandhi

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Dr. R.K.Ippar**
**Gest Editor:**
**Principal**

| Dr. B.K. Shep, Head, Dept. of History | Dr. R.D. Rathod, Head, Dept. of Sociology | Prof.(Dr.) V.B. Gaikwad, P.G. Coordinator, Science |
|---|---|---|

**Executive Editor:**
Jawahar Education Society's Vaidyanath College Parli- Vaijnath, Dist. Beed.

Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

# Editorial Board

**Chief Editor -**

Prof.Virag S.Gawande,

Director,

Aadhar Social Research &,

Development Training Institute, Amravati. [M.S.] INDIA

**Executive-Editors -**

- Dr.Dinesh W.Nichit - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm.Sci Collage, Walgaoa.Dist. Amravati.
- Dr.Sanjay J. Kothari - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm.Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

**Advisory Board -**

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi** ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel. Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji.
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University,Bodhgay Bihar

**Review Committee -**

- **Dr. D. R. Panzade**, Assistant Pro., Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Subas R.Patil** ,Principal ,government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. Kundan Ajabrao Alone ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- DR. Gajanan P. Wader Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- Dr. Bhagyashree A. Deshpande, Asstt. Professor Dr. P. D. College of Law, Amravati

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

- Executive Editor

Published by -

**Prof.Virag Gawande**

**Aadhar Publication** ,Aadhar Social Research & Development Training Institute, New Hanuman Nagar, In Front Of Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College,Amravati ( M.S ) India Pin- 444604 **Email :** aadharpublication@gmail.com

**Website :** www.aadharsocial.com **Mobile : 9595560278 /**



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 41 | ग्रामस्वराज्यासंबंधी महात्मा गांधीजींचे विचार — डॉ. वैशाली शेषराव पेरके | |
| 42 | महात्मा गांधी व सविनय कायदेभंग चळवळ — हितेश लिलाधर घोरटक्के / प्रा.डॉ. पंकजकुमार शंकर प्रेमसागर | |
| 43 | ग्रामविकासात महात्मा गांधीजींच्या विचारांच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास — डॉ.सुनंदा भद्रशेटे | |
| 44 | महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार — प्रा.डॉ.गजानन रा. लोहवे | |
| 45 | महात्मा गांधीजींचे सत्याग्रह विषयक विचार — प्रा.डॉ.चव्हाण सुखदेव गोविंदराव | |
| 46 | महात्मा गांधी आणि स्वदेशी अर्थव्यवस्था — प्रा.डॉ.अंबादास पांडुरंग बर्वे | 1 |
| 47 | महात्मा गांधीजींचे सत्य व अहिंसाविषयक विचार — प्रा.डी.आर.कोळी / प्रा.डॉ. आर.डी.जाधव | 1 |
| 48 | महात्मागांधी – रामराज्य या आदर्श राज्य — चन्द्रप्रकाश माली /डॉ. विष्णु कुमार | 16 |
| 49 | Investment Awareness and Economic Thoughts: Role of Gandhi ji — अमन आहुजा | 17 |
| 50 | भारतीय शास्त्रीय संगीत–भजन और राष्ट्रपिता महात्मा गांधी — प्रा. अमोल वासुदेवराव गावंडे | 173 |
| 51 | महात्मा गांधींचे सत्य अहिंसेबाबतचे विचार — प्रा. सय्यद आर. आर | 176 |
| 52 | महात्मा गांधींचे ग्रामस्वराज्य संदर्भातील विचार — प्रा.डॉ. बाळासाहेब मुंढे | 179 |
| 53 | महात्मा गांधी व ग्रामीण विकास — डॉ. मनोज गं. राठोड | 182 |
| 54 | महात्मा गांधींची सामाजिक,आर्थिक विचारधारा — प्रा.डॉ रामधन हिरे | 185 |

# महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार

प्रा.डॉ.गजानन रा. लोहवे
मराठी विभाग प्रमुख, बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा ता.घाटंजी.जि.यवतमाळ,

**प्रस्तावना :**

विसाव्या शतकात ज्या काही महापुरुषांचा भारतीय समाजावर प्रभाव पडला आणि त्यांचे विचार आजही कृतीयुक्त आहेत अशांमध्ये महात्मा गांधींचे नाव वरचे आहे. १९२० पासून गांधी युगाला प्रारंभ झाला आणि सत्य, अहिंसा या तत्वाला पुन्हा एकदा महत्व आले. बुद्धाची अहिंसा ही पुढे आपल्या शब्दात थोडा बदल करून गांधीजींनी सांगितली. या अहिंसेचा भारतीय मनावर विशेष प्रभाव दिसतो. तेच त्यांच्या शैक्षणिक धोरणाचेही आहे. गांधीजींची स्वावलंबी शिक्षण योजना भारताच्या शैक्षणिक प्रवासातील आणि विकासातील महत्वाची योजना आहे. तिचा प्रभाव भारतीय शिक्षण प्रणालीवर निश्चितच पडलेला आपल्याला पहायला मिळतो. महात्मा गांधी यांनी स्त्री शिक्षणाबरोबरच अस्पृश्यांच्या शिक्षणाबाबतही विचार केला. मुलोद्योगी शिक्षण प्रणाली सोबतच धार्मिक शिक्षणाचाही त्यांनी पुरस्कार केला.

**शोध निबंधाचे उद्दिष्टये :**

१.महात्मा गांधींचे धर्मविषयक शिक्षणाचे महत्व सांगणे.

२.स्त्री शिक्षणाची उपयोगिता तपासणे.

३.शिक्षण प्रणाली आणि समाजाची आवश्यकता व त्याची उपयोगिता तपासणे.

४.आजच्या काळात गांधीविचारांची आवश्यकता पडताळून पाहणे.

**महात्मा गांधींचा काळ हा अससल इंग्रजी अंमलाचा काळ होता. इंग्रजांच्या आगमनाने भारतात शिक्षण आले. पाश्चात्य विचार आले. इंग्रजांना राज्यकारभार चालविण्यासाठी इंग्लंडवरून कामगार किंवा शिक्षित माणसे आणणे शक्य नव्हते. त्यामुळे राज्यकारभार हाकलण्यासाठी भारतीय हाडामासाचे व इंग्रजी मानसिकतेचे साक्षर हवे होते. यासाठी त्यांनी शाळा सुरू केल्या. यामध्ये पहिल्या पिढीतील माणसे शिकू लागली. मात्र ती विचारी असण्यापेक्षा इंग्रजाळलेली अधिक होती. साक्षर होणे म्हणजे शिक्षण हीच धारणा झाली होती. या संदर्भात महात्मा गांधी म्हणतात,"केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे शिक्षणाचा प्रारंभदेखील नव्हे आत्मा व मन यांचा परिपूर्ण विकास करून व्यक्तीमत्वातील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती करणे हे शिक्षणाचे खरे ध्येय आहे. शिक्षण म्हणजे माणसाचा सर्वांगिण विकास होय. ही विचारसरणी महात्मा गांधींनी रूजविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे माणसाचा शैक्षणिक विकास होत असताना त्याचा धार्मिक विकासही झाला पाहिजे. यासाठी त्यांनी धर्मविशयक शिक्षणालाही महत्व दिले. शिक्षणाचा उपयोग केवळ नोकरीसाठी किंवा पद आणि प्रतिष्ठा मिळविण्या व मिरविण्यासाठी नसून ते शिक्षण जिवनोपयोगी असले पाहिजे. असा त्यांचा समज होता. त्यांच्या** शिक्षण विषयक कल्पना पाहूया.

**शिक्षणाचे उद्दिष्टय** - महात्मा गांधींचा शिक्षण विषयक दृष्टीकोन पाहत असताना महात्मा गांधींचे शिक्षणविषयक विचार हे परिस्थितीनुसार बदलणारी आहेत. हे त्यांच्या तत्वज्ञानाचे वैशिष्टयच म्हणावे लागेल. त्यांच्या दृष्टीने चरित्र संवर्धन व्हावे सहिष्णुता, उद्योगप्रियता, स्वावलंबन इत्यादी गुण यावेत हेच शिक्षणाचे हेतू होते. महात्मा गांधींनी शिक्षणाची आणखी काही उदिष्टये गृहीत धरली होती. ईश्वर प्राप्तीसाठी आत्मसंयमन, आत्मशुद्धी, मनोनिग्रह हे मुद्दा शिक्षणाद्वारे साध्य करता येते असे त्यांना वाटत होते.

मानवी जीवन ईश्वराने निर्माण केलेली सुंदर सृष्टी असल्यामुळे या मानवी बौद्धिक भौतिक व आध्यात्मिक वृत्ती म्हणजे सर्व काही नव्हे तर शिक्षण हे समाज परिवर्तनाचे महत्वाचे साधन आहे असे त्यांना वाटत होते. व्यक्तीच्या जीवनाला आणि समाजाला नवी दिशा दयावयाची असेल तर शिक्षणासारखे दुसरे प्रभावी माध्यम नाही. असे त्यांना वाटत होते.

**१.जिवनोपयोगी शिक्षण** - ज्या शिक्षणातून आपल्या पायावर उभे राहून पोट भरण्याचे सामर्थ्य व्यक्तीमध्ये निर्माण होत नाही ते जीवनातील निरनिराळ्या समस्यांना तोंड दयायला उपयोगी पडू शकत नाही त्या शिक्षणाचा सामान्य माणसाला

काही उपयोग होत नाही. हस्तव्यवसायाचा शिक्षणामध्ये उपयोग करून मुलांना [illegible] प्रत्यक्ष [illegible]
उत्पादकतेमध्ये सर्व भारतीयांचे योगदान देणे होय. असे महात्मा गांधींना वाटत होते. शिक्षणाचा खरा अर्थ स्वावलंबन
आणि स्वयंपूर्णता शिकविणे असा विचार महात्मा गांधींनी मांडला. शिक्षण हे जीवन विकासासाठी व जीवन समृद्धीसाठी शि
पाहिजे असा पुरोगामी विचार त्यांनी मांडला पुस्तकी शिक्षण जीवन समृद्धीच्या दृष्टीने कुचकामी स्वरूपाचे आहे हे त्यांनी
प्रतिपादन केले. जीवनोपयोगी शिक्षण तत्त्वामागे गांधीजींच्या समोर भारताचे शिक्षणाचे चित्र कारणीभूत होते. भारतातील

२.मूलोद्योगी शिक्षणपद्धती - या शिक्षण पद्धतीला जीवनोपयोगी शिक्षण पद्धतही म्हटल्या जात होते. १९३७ साली शिक्षण परिषदेसमोर या संदर्भात विचार महात्मा गांधींनी मांडले होते. या परिषदेला दादा धर्माधिकारी, विनोबा भावे, नरेंद्र देव, काका कालेलकर,आर्यनायकम,डॉ.झाकीर हुसेन इत्यादी तज्ञ होते. गांधीजींनी मांडलेल्या या योजनेची पुढील काही वैशिष्ट्य होती.

१.सात ते चौदा वर्षांपर्यंत शिक्षण हे सक्तीचे आणि निशुल्क असावे.
२.शिक्षण हे मातृभाषेतूनच असावेक.
३.शिक्षणाने स्वावलंबन यावे यासाठी त्यांनी शिक्षण हे स्वाश्रयी असावे असे म्हटले होते.
४.शिक्षणात हस्तव्यवसायाला खास महत्व असावे.

या योजनेचा आणखी एक विशेष म्हणजे त्यात विद्यार्थ्यांच्या सामाजिक व नैतिक विकासाची करण्यात आलेली सोय. त्यासाठी विविध प्रकारच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा योजनेत अंतर्भाव करण्यात आला. असे कार्यक्रम म्हणजे निरनिराळे सण, समारंभ, जयंत्या, पुण्यतिथ्या, राष्ट्रीय उत्सव, साक्षरताप्रसार, ग्राम सफाई, सहली, भेटी, भाषणे, चर्चा-वादविवाद, सामुदायिक प्रार्थना इत्यादी. हे कार्यक्रम विद्यार्थ्यांनी संयोजित करायचे व त्यात सामाजिक लोकांनाही सहभागी करून घ्यायचे म्हणजे शाळा व समाजजीवन यांचा संबंध प्रस्थापित होईल व विद्यार्थ्यांमध्ये केवळ सत्प्रवृत्तीचाच विकास होणार नाही तर सामाजिक जबाबदारीची जाणीव व सामाजिक कार्यक्षमता निर्माण होईल. शैक्षणिक समाजशास्त्रात या कार्यक्रमांना फार महत्व दिले जाते. शिवाय शाळा व यांच्या परस्परसंबंधातूनच समुदाय शाळेची कल्पना निघाली.
इत्यादी वैशिष्ट्ये त्यांच्या या शिक्षणपद्धतीची होती.

३.स्त्री शिक्षणाचा विचार - भारतात प्राचीन काळापासून स्त्री ही अशिक्षित राहिली. कारण भारतातील पुरूषांनी स्त्रीला सहचारिणी, सखी, अर्धांगिनी मानण्याऐवजी मोलकरीण मानले, असे महात्मा गांधींना वाटत असे. प्राचीन काळापासून गुलामगिरीमध्ये जीवन जगणाऱ्या स्त्री जातीचा उद्धार करण्यासाठी महात्मा गांधीजींनी खूप प्रयत्न केले. स्वराज्यात स्त्रीला पुरूषाइतके हक्क द्यावेत असे त्यांचे मत होते.

४.हरिजन शिक्षणाविषयी - अस्पृश्यता हा हिंदूधर्मावरील कलंक आहे. तो आपणच पुसून काढला पाहिजे. असे महात्मा गांधींचे तत्वज्ञान होते. त्यासाठी त्यांनी हरिजन ही नवी संकल्पना आणली. त्यांचा उद्धार झाला पाहिजे या भावनेतून त्यांनी त्यांच्यावर काही पैसेही खर्च केले. हरिजनांच्या झोपड्यांपर्यंत शिक्षण पोहचविण्यासाठी त्यांनी काही प्रयत्नही केले.

५.धार्मिक शिक्षण - सरकारी शाळा, कॉलेजातून निघालेले विद्यार्थी धार्मिक शिक्षणाबाबतीत कोरे करकरीत राहतात. ही गोष्ट निर्विवाद आहे. काही लोकांना असेही वाटते, की सार्वजनिक शाळांमधून केवळ आपल्या धर्मविषयांचे शिक्षण देण्यात यावे. भारतासारख्या भिन्न धर्माचे मिश्रण असलेल्या देशात शाळांमधून धार्मिक शिक्षण देणे कठीण असल्याची मला जाणीव आहे. पण आमच्या अध्यात्मकतेचे दिवाळे वाजू नये असे वाटते.तर आम्हाला इतर विषयांइतकेच धर्मशिक्षणालाही महत्व द्यावे लागेल. धर्मांचे पुस्तकी ज्ञान आणि धर्म यात पुष्कळच अंतर आहे. पण जर आमच्या मुला-मुलींना धर्म देता येत नसेल तर दुधाची तहान ताकावर भागविण्याच्या न्यायाने त्यांना शक्य ते देण्यावरच समाधान मानणे भाग आहे.

६.उच्च शिक्षण आणि महात्मा गांधी -

विश्वविद्यालयांनी फक्त परीक्षेचे काम करावे आणि प्रवेश फीच्या भरवशावर स्वतःचा खर्च भागवावा. त्यांच्याकडे निरीक्षणाची आणि विभिन्न अभ्यासक्रम मंजूर करण्याचीही जबाबदारी राहील. विश्वविद्यालयाच्या परवानगी शिवाय कोणतीही खाजगी शाळा चालवू नये. मात्र महात्मा गांधी हे उच्च शिक्षण सार्वत्रिक व्हावे या विचाराचे नव्हते. तर ज्यांच्या सेवेचा राज्य सरकारला उपयोग असेल तेवढ्यांनाच उच्च शिक्षण दिले जावे. त्याशिवाय शिक्षणाचे जे क्षेत्र उरेल त्यात खासगी संस्थांनाच काम करण्यास देणे उचित होईल. महात्मा गांधींचा हा दृष्टीकोण म्हणजे मूठभर लोकांना उच्चशिक्षित करणे

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO. 248
ISSN : 2278-9308
October,2020

आणि बहुसंख्य पण अनादि काळापासून पिळल्या गेलेल्या, अपमानित व तिरस्कृत केलेल्या लोकांना पुन्हा मुख्य प्रवाहापासून दूर ठेवण्यासारखे होईल.

७.शारीरिक शिक्षण - व्यायाम व खेळ यांचे महत्व ओळखून शिक्षणात शारीरिक शिक्षणाला फार महत्वाचे स्थान दिले आहे. सदृढ शरीरातच सदृढ मन वास्तव्य करते हे गांधीजींनी ओळखले व शिक्षणात शारीरिक शिक्षण सक्तीचे केले. ठिकठिकाणी व्यायाम मंदिरे स्थापन केली पाहिजेत असे त्यांचे विचार होते.

८.शैक्षणिक तत्वज्ञानाची चतुःसूत्री - गांधीजींचे स्पष्ट मत होते की, व्यक्ती-व्यक्तींमधील संबंध हे विश्वासावर आधारित असले पाहिजेत, भितीवर नाही, कारण त्यांची निष्ठा अशी होती की मनुष्य हा स्वभावतःच चांगला आहे. मानवी अंतःकरणातील निसर्गदत्त चांगुलपणा हा त्यांच्या विचारांचा मूळ आधार आहे. म्हणून मनुष्य फक्त सुशिक्षित असून चालणार नाही तर तो सुसंस्कृत व चारित्र्यसंपन्न असला पाहिजे. म्हणून जे शिक्षण असे चारित्र्याची निर्मिती करू शकते तेच सर्वोच्च शिक्षण होय.

गांधीजींच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा मूळ गाभाच मानवतेची सेवा हा आहे कारण गांधीजींना शिक्षणातून माणूस निर्माण करावयाचा होता. म्हणूनच शाळा म्हणजे माणुसकीचे पाठ देणारी मंदिरे होत, असे त्यांना वाटत असे. या सत्यालाच ते ईश्वर मानीत असत. मानवतेतच खरा ईश्वर लपलेला आहे ही सेवाच ईश्वराला पोहचते असे त्यांचे मत होते. मानवतेची सेवा हीच ईश्वराची सर्वश्रेष्ठ पूजा आहे. म्हणूनच या मानवात लपलेल्या ईश्वराचे दर्शन घेणे हा शिक्षणाचा एक भाग आहे. म्हणूनच माणसाचे मोठेपण, त्याने माणसासाठी केलेल्या उपकारक कार्यावरच अवलंबून असते असे गांधीजींचे स्पष्ट मत होते.

शिक्षण ही मनुष्य घडविणारी प्रक्रिया आहे. शिक्षण हे केवळ शाळेतच मिळते असे नव्हे तर जगाच्या प्रत्येक क्षणास कोणीना काही नविन शिकत असतोच. ज्या वेळी शाळाच नव्हत्या त्यावेळीसुद्धा अनेक तेजस्वी पुरुष जन्माला आले होते. तेव्हा आज आपण शिक्षण म्हणजे अक्षर ज्ञान असे म्हणतो याला फारसा अर्थ नाही. शिक्षण म्हणजे आदर्श जिवनाची ओळख करून घेण्याचे एक प्रमुख साधन आहे. म्हणूनच शिक्षण म्हणजे मनुष्य बनविण्याची एक प्रक्रिया आहे. असे गांधीजींना वाटत होते.

प्रौढ शिक्षणासंदर्भात गांधीजींना वाटत होते की जनतेची सर्वव्यापी निरक्षरता हा भारतातील फार मोठा कलंक आहे. तो नष्ट झालाच पाहिजे. अक्षर ओळख झाली म्हणजे सर्व काही त्यात आले असे नव्हे तर उपयुक्त ज्ञानाच्या प्रचाराशी संलग्न अशा रितीने साक्षरता प्रसाराचे कार्य झाले पाहिजे. लिहिण्यावाचण्याचे निवळ कोरडे शब्दज्ञान अथवा आकडेशास्त्र हे खेडुतांच्या जीवनाचे कधीही मुख्य अंग असे शकत नाही. दैनंदिन जीवनात उपयोगी पडेल असेच शिक्षण त्यांना द्यायला हवे. ते त्यांच्यावर लादले जाता कामा नये. त्यांच्या प्राप्तीची त्यांना भूक लागावी. आज त्यांना मिळणाऱ्या शिक्षणाची त्यांना गरज नाही, त्यांना त्याचे महत्वही नाही. लिहिण्यावाचण्याच्या पात्रतेला जोडून, त्यांना गावाशी संबंधित गणित, भूगोल, इतिहास, साहित्य इत्यादींचे फक्त सामान्य ज्ञान दिले म्हणजे त्याचा त्यांना प्रतिदिनी उपयोग करता येईल. त्यापुढे ते स्वतःच्या बळावर पुढचा मार्ग चोखाळतील. ज्या पुस्तकांतून त्यांना दैनंदिन उपयोगाचे व्यावहारिक ज्ञान प्राप्त होत नाही, ती खेडुतांच्या दृष्टीने निरुपयोगी आहेत.

महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेत १९०४ रोजी फिनिक्स आश्रमाची स्थापना केली. तेथे याच आश्रमातून आपल्या शैक्षणिक प्रयोगाची त्यांनी सुरुवात केली होती. त्यासोबतच बिहार येथील चंपारण्यात १९१७ रोजी ग्रामशिक्षणाची सुरुवात केली. ग्रामीण भागातील लोकांना शिक्षणाविषयी आवड व आस्था निर्माण करण्यासाठी चंपारण्याची निवड केली होती. महात्मा गांधीच्या पुढाकाराने १९२० रोजी गुजरात विद्यापीठाची स्थापना झाली.महात्मा गांधी उच्च शिक्षण भारतातील जनतेला मिळावे या मताचे होते कारण उच्चशिक्षण घेण्यासाठी सर्वच लोक परदेशात जाऊ शकत नाही हा दृष्टीकोन लक्षात घेवून गुजरात विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.

९.निष्कर्ष :

१.शिक्षण हे माणसाच्या विकासाचे महत्वाचे साधन आहे असे गांधींना वाटत होते.

२.शिक्षण हे केवळ शाळा,महाविद्यालयांमध्येच मिळत नसून ते समाजामध्येही पदोपदी मिळते. असा त्यांचा विश्वास होता.

३.प्रौढ शिक्षण हे सुद्धा भारताच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे. म्हणून प्रौढ शिक्षणाची निरंतर आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली.



Scanned with CamScanner

ISSN : 2278-9308
October,2020

४ शिक्षणाच्या माध्यमातून एखाद्याने दुसऱ्याला शिक्षण देणे म्हणजे ईश्वराचे कार्य करणे होय असे त्यांना वाटत होते.

५ शिक्षण आणि अध्यात्म यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या शिक्षणविषयक धोरणात आपल्याला दिसतो.

६ शिक्षणातून मनुष्य निर्माण व्हावा असा त्यांचा शैक्षणिक दृष्टीकोन होता.

१०.संदर्भ ग्रंथ :

१. सिंह बी.एन.- भारतीय सामाजिक चिंतन, विवेक प्रकाशन,दिल्ली,
२. मंगळवेढेकर राजा - राष्ट्रपिता महात्मा गांधी,ज्योत्स्ना प्रकाशन पुणे,
३. लोकराज्य- ऑक्टोबर २०१०
४. महात्मा गांधी - माझे सत्याचे प्रयोग.
५. आचार्य.धनंजय - गांधी युग,

online

(3)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

JULY - SEPTEMBER - 2020

Volume - IX Issue - III

ENGLISH PART - II / MARATHI / HINDI

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING

2019 - 6.399

www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole

M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.), M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan

Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | दक्षता समितीचे सक्षमीकरण आणि पुनर्गठन एक काळाची गरज<br>प्रा. शशिकांत भालचंद्र पाटील | ५५-५९ |
| १३ | लोकसाहित्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा संबंध<br>प्रा. डॉ. विनोद पु. भालेराव | ६०-६५ |
| १४ | महाराष्ट्र राज्यातील भूमी उपयोजनातील बदलाचा भौगोलिक अभ्यास<br>प्रा. डॉ. देशमुख एस. बी. | ६६-६९ |
| १५ | लोकप्रशासन व माहिती तंत्रज्ञान<br>डॉ. आरबळे एस. डी. | ७०-७४ |
| १६ | कोरोनोत्तर जग आणि मराठी साहित्य<br>प्रा. डॉ. गजानन रा. लोहवे | ७५-८० |
| १७ | ग्रामीण क्षेत्रातील बालकामगारांच्या समस्या आणि शासनाची भूमिका<br>प्रा. डॉ. गजेंद्र एम. कदम | ८१-८५ |
| १८ | कोरोना महामारी आणि आपत्ती व्यवस्थापन<br>प्रा. डॉ. मीरा विठ्ठलराव फड | ८६-८९ |
| १९ | वाचन संस्कृतीचा ऱ्हास आणि ग्रंथालयांचे योगदान<br>प्रा. डॉ. प्रशांत रामदासजी राऊत | ९०-९४ |
| २० | भारतातील लैंगिक असमानता : समस्या, कारणे आणि उपाय<br>मंदाकिनी निहिते<br>डॉ. बी. एम. करहाडे | ९५-९८ |
| २१ | सामाजिक जागृतीमध्ये सार्वजनिक ग्रंथालयाचे योगदान<br>प्रा. डॉ. गव्हाने महारुद्र प्रभु | ९९-१०१ |

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १६. कोरोनोत्तर जग आणि मराठी साहित्य

प्रा. डॉ. गजानन रा. लोडगे
मराठी विभाग प्रमुख, बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ.

## प्रस्तावना

संकटं दोन प्रकारचे असतं. एक मानवनिर्मित व दुसरे निसर्गनिर्मित. मानवनिर्मित संकटाला मानव जबाबदार असल्याने त्याच्या उदय–विकासापासून तर निरसनापर्यंत सर्वच मंडळी जाते आणि त्याला जबाबदार धरल्या जाते. निसर्गनिर्मित संकटामध्ये मानव जबाबदार नसून संकटाच्या उद्रेकासाठी या घटीसाठी आणि त्याच्यावरील नियंत्रणासाठी त्याची सार्वधमता पणाला लागते. माणसाच्या अनेक क्षमता, अनेक साधने आणि विविध माध्यमे यासाठी सक्रीय असतात. साहित्यही त्याला अपवाद नाही. समाजातील अशा बारीक–सारीक गोष्टीचे पडसाद साहित्यात उमटत असते. समाज जेव्हा संकटाच्या अग्नि दिव्यातून जातो तेव्हा साहित्य धीर देते, नवी उभारी देते, मोडलेल्या माणसांचे दुःख आणि डोळ्यांना अश्रूंच्या ओघाला दीप लावण्याचे काम साहित्य करते.

## उद्देश

कोरोनाच्या संकटाने साहित्याला नवनवे विषय दिले तर साहित्यसुद्धा कोरोनामय जगाला जगण्याची नवी शैली, नवा आशय आणि विषय देईल. कोरोना पश्चात जगात साहित्याची भूमिका ही पुन्हा नव्याने जग निर्माण करण्याची उमेद निर्माण करणारी असेल. कोरोनापश्चात जगाचे मराठी साहित्यामध्ये कसे पडसाद पडेल, जगाच्या पुनर्बांधणीसाठी साहित्याची जबाबदारी आणि कशी भूमिका असेल याचा वेध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात केला आहे

## ऐतिहासिक आढावा

पृथ्वीची निर्मिती एका स्फोटाने आणि हजारो वर्षे तप्त गोळा थंड होण्याच्या प्रक्रियेतून झाली आहे. त्यामुळे वेदना आणि वेदनेतून नवनिर्मिती हा जगाचा इतिहास आहे. या इतिहासामध्ये ज्या प्रमाणे विकासाचे आणि सुखाचे क्षण दिसतात तसे काही संकटांशी युद्ध आहे. मग ते अस्मानी असो की सुलतानी असो, मृत्यूचा तांडव करणारा प्लेग सारखा साथीचा रोग असो की दहशतवाद्यांनी जगाला हादरून सोडणारे असो वर्ल्ड ट्रेड सेंटर या मुंबईतील २६/११ चा दहशतवादी हल्ला असो की महाभारतातील युद्धा प्रमाणे पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाने माणसाच्या निती आणि विश्वासाला धुर फासणारे विध्वंसक सत्य असो. त्सुनामी आजही उद्ध्वस्त झालेल्या माणसाच्या मनात भिती दाखवते आहे तर अफगाण वादळात उध्वस्त झालेल्यांना मरण यातना दाखवत आहे. 'निसर्ग' वादळाच्या विध्वंसक विनाशानंतर अजूनही सावरता आलेले नाही. असा अनेक संकटांनी ही पृथ्वी व्यापून निघालेली आहे. मात्र प्रत्येक संकटामध्ये ही नव्याने काही शिकली, जुन्यातून



CS Scanned with CamScanner

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

सदा पेटून नव्याने जसे प्रयोग केले. या प्रयोगांतूनच त्याच्या गुहांचे आगमन गुहातून गेल्यानंतर आपण पाहिले आहे. गुहेत माणूस पाहात बाहेर जिवंत नाही म्हणून दुःखाने त्याला त्याच्या अंतःकरणाशी जाणीव होते आणि त्याच्यातील सर्जनशीलतेला प्रश्न येतो. म्हणजे या जगात ही शोधाची जननी आहे. त्याप्रमाणे माणसाने शोधून शोध लावले. यावरून असे अगा होतो की पंचाशी सत्य ही समाजासाठी दुःखदायक जरी वाटत असली तरी अंतिमतः ती सर्जनशीलतेसाठी आणि जगाच्या विधायक पुनर्निर्माणासाठी पुरुषार्थकारक असतात. कारण समाजाचा माणसावर विकास होतो. संकटातून माणसाच्या बुद्धीला, त्याच्यातील उपजत जाणीवेला शोध लागतो आणि परिस्थितीनुरूप त्याचे प्रकटीकरण होते. म्हणून आपण संकटाकडे संकट म्हणून न पाहता सकारात्मकतेने पाहिले पाहिजे.

असा संकटामधून साहित्याने नेहमीच जगाला नवा दृष्टिकोन दिला आहे, नवी आशा आणि नवा प्रकाश दिला आहे. जेव्हा जेव्हा जगावर संकट आलेत तेव्हा तेव्हा साहित्यामध्ये त्याचे प्रतिसाद उमटले आणि तेथून पेटले चळवळ निर्माण झाले. त्या चळवळीने जगाला शिकविले, सहाय्य केले आणि विकासाच्या मार्गक्रमणासाठी प्रवृत्त केले. साहित्याने जगावर आलेल्या संकटाची निश्चिती केली. संकटामध्ये होरपळलेल्या जिवाला आधार मिळाला. माणसाच्या वृत्ती–प्रवृत्तीवर जरी टीका केली तरीच माणसाचे समर्थन केले किंबहुना ते नव्या जगाच्या मध्यवर्ती ठेवले. त्यातूनच माणसाने नव्या जगाची वीट रचली. माणसामाणसातील संबंध हेच जगाच्या विकासाचे गमक मानले किंबहुना ते शिकविले. संकटामधील माणसाच्या वर्तनाचे विश्लेषण केल्याने पुढील काळात माणसामधील संबंध दृढ होण्यास नेहमीच मदत झाली. साहित्याच्या सर्जनशीलतेने नव्या जगाचे विज्ञापन होते म्हणूनच साहित्य हे संकटाला नवे संदर्भ देते, नवी नवी ऊर्जा आणि नवा आयाम देते.

पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाने माणसाच्या अस्तित्वाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण केले होते. मुसोलिनी, हिटलरसारख्याने वर्णन जग कधीही विसरणार नाही. माणूस इतका क्रूर असू शकतो हे जग तेव्हापासून मनाने पहिल्यांदा सामोरे जात होते. तोपर्यंत पुस्तकातील युद्ध आणि युद्धातील माणूस या जगाने पाहिला होता. पुढे तर हिटलर युगी जगभर प्रतिष्ठान आहे याचाही प्रत्यय आला.

'पिपांत मेले ओल्या उंदिर, मान पडल्या मुरगळल्याविण,
ओठांवरची ओठ मिळले माना पडल्या आडकळीविण'

ही माणूस म्हणविणाऱ्या आणि स्वतःला मानवांतील सर्वश्रेष्ठ म्हणविणाऱ्या माणसाची केविलवाणी, क्षणभंगुर जीवनासक्ती बा.सी.मर्ढेकरांनी व्यक्त केली.

'मी एक मुंगी, तू एक मुंगी
या एक मुंगी, त्या एक मुंगी'

आपण सारेच मुंगीच आहोत. माणसाचे मुंगीचे जगणं आणि फुगा फुटावा इतके सहज मरणं माणसाने अनुभवलं म्हणूनच कुसुमाग्रजांनी या जगाच्या अस्तित्वाचा वेध घेणार, माणसावर जिवापाड प्रेम करणारा पण इतरांच्या कुसुमाप्रमाणे दुर्मिळ झालेला 'माणूस' शोधला. माणसाच्या भावभावना माणसाचा मनाला पण म्हणून तर माणूस आपल्यातील माणसासाठी लाजिरवाणा होता हे आहे हे साहित्याने दाखवून दिले.



CS Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

माणूसपण जपण्याचा प्रयत्न करतो. हा प्रयत्नवादही साहित्यानेच शिकविला. साहित्य हे दुःखावरील फुंकर असते. दुःखच कलात्मकतेने सजवून त्यातील तिढा ते कधी कमी करते तर कधी भावनांशी खेळून त्याचा कॅथार्सिस करते. पात्रातील दुःखाशी नाते, उत्कट नाट्य याचा प्रत्यय ते देते. त्यामुळेच माणूस प्रसंगावधान राखतो तर कधी घडून गेलेल्या प्रसंगाने सहाय्य होते. इतिहास आणि भविष्यातील सुख–दुःखाच्या जाणिवेने समजूत अशी आपली याद तो निर्माण करतो. मराठीचे साहित्य हे सकारात्मक मान करणारे ठरले असते.

येथून पुढे साहित्याचे विषय बदलतील. कवितांचे मार्ग वेगळे होतील. कथा–कादंबऱ्यांचे परंपरागत नायक यावद्दल बदलून नवे येतील. प्रतिमा, प्रतीके आणि मिथकेही कोरोनाशी संबंधित असतील. शृंगारिक उपमा आणि अलंकारिक भाषेऐवजी कोरोनाचे भय सांगणारे असेल. कदाचित याच भयातून नव्या निर्भय जाणीवांची निर्मिती साहित्यात असेल. जगाच्या कानाकोपऱ्यात जसा कोरोना शिरला तसा प्रत्येकाने त्याला काही नवे तेव्हा बागुलबुवा केला. लहान मुलांना म्हणत असत तेव्हा "चुप बैठ नाही तो गब्बर आयेगा!" तर अलीकडे "पोलीस पकडून नेतील!" अशी समजूत दिली जायची. आता मात्र मुलांना स्वप्नही कोरोनाचेच पडतात. आई–वडिलांच्या मायेपेक्षा कोरोनाचा धाक अधिक होतो आहे. 'सामजग' सोडून आता कोरोनाचा जोर अधिक वाढला आहे हे आपण टिव्हीवरील बातम्यावरून अनुभवतो. असा हा कोरोना आपल्या रक्तामध्ये मिसळलेला नाही पण मन, मेंदूमध्ये ठाण मांडून बसलेला आहे. एखादा कॅन्सरग्रस्त रुग्ण जसा कॅन्सरच्या विळख्यात मरण पावतो तसे आपण आता कोरोनाच्या सावलीने जगणार आहोत. या.गो. महाजनांच्या शब्दात 'जगायची पण सक्ती आहे मरायची पण सक्ती आहे—कोरोनामुळेच'. आयुष्याच्या सायंकाळी अनवाणी पायांनी चालताना जसे भेगाळलेले पाय रक्तबंबाळ करावे तसे कोरोनाने जग माणुसकीच्या नात्याने उसवलेले तर पुढे फाटलेल्या जीर्ण कापडाप्रमाणे असेल. माणसाच्या प्रतिष्ठेला वर्तमान सरकार सत्ताधाऱ्यांना आता वर्तमान धर्माने अधिक महत्त्व वाटेल. त्याप्रमाणे एकूणच आयुष्यावर केलेले फेशियल असून त्याची ठमान वाटेल. सत्ता आणि धर्म यांतील आत्मकेंद्री वाढलेली माणसांची दरी मनी होईल. मात्र नात्यातील आभासीपणा अधिक गडदपणे जाणवेल. 'पैसो नाही गळ्याचे सिवा अनगढीत' ही सुसंगतपणाची सुभाषिते 'मी' आणि 'माझे'पणाच्या स्वार्थाचा भाग होईल. साहित्यातील आईपणाच्या पवित्र नात्यासाठी कोरोनात कुस लागला, तेव्हा पैसा धर्मासाठी समूह आणि कुटुंब यामध्ये नात्याने अधिक प्रभावी ठरल्याने आपण पाहिले आहे. नात्यामधील 'स्व'जाणिवेच्या पलीकडील नाजूक तार उलगडीत येऊन नात्याने आभासी तत्त्व प्रत्ययास आले आहे. कोरोनामुळे जगाची आणि देशाची अर्थव्यवस्था कोलमडली असली तरी प्रामुख्याने याचा फटका शेतकरी, अल्पभूधारक, मजूर, छोटे व्यावसायिक असे सर्वच ठसे सहन करणाऱ्या समाजात असलेले, गरिबांनी नावरलेले पद पुन्हा दारिद्र्याच्या खाईत ढकलले जाणार आहे. त्याने शैक्षणिक प्रश्न मग ते शिक्षण शुल्काचा असेल, निवासाचा असेल, स्कॉलरशिपचा असेल, नोकरीचा असेल किंवा स्पर्धा परीक्षेच्या तयारीचा, वयाचा व रोजगाराचा असेल ते सर्व आता कोरोना निगडून घेणार आहे. सर्वसामान्य, कष्टकरी माणसांच्या समाजातून निघणाऱ्या पुढच्या पिढीचा आशावाद आता मावळणार आहे. इंग्रजांच्या आधीच्या गरीबी आणि बेरोजगारी आता कोरोनामुळे वाढीस लागणार आहे. आर्थिक मंदीमध्ये सरकारजवळ पैसा नसल्याने आवश्यक गोष्टींवरच



CS Scanned with CamScanner

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

सर्व करण्याचे उद्याचे शिक्षणाच्या दुर्गमी गरीबांना देणाऱ्या आवश्यक सेवा अत्यावश्यक म्हणून वाढल्या जातील. खाजगीशाळांना प्रोत्साहन देणाऱ्या धोरणाने त्या शाळांचे शुल्क भरण्याची सोय नसलेल्या ८० टक्के बहुजन इंग्रजी माध्यमे आणि उच्च शिक्षणापासून दूर राहतील आणि सरकारी शाळांची गुणवत्ता सोईस्करपणे खाजगीकरणासाठी खालावली जाईल. सरकारी सेवांचे खाजगीकरण झाल्याने सामान्य जनता [illegible] अडचणीत येईल. नोकरीची शाश्वती नाही, आरोग्याची सोय नाही, शेती आणि शेतकऱ्याला भाव नाही. गरिबांना रोजगार नाही आणि हातावरच्या समाजाच्या फायद्याचीही हमी नाही. इंटरनेटच्या वाढत्या मायाजालात सारे जग जखडून निघताना ग्रामीणातील अशिक्षित आणि अर्धशिक्षित पालक नेटचे कनेक्शन नसल्याने शाप म्हणून अनुभवत राहणार आहेत. नेटमधील ऑनलाइन ॲप वापरून 'झूम' होऊन काही जण त्यापासून 'सुन्न' होणार आहेत. अशांसाठी जातीची आणि धर्माची [illegible] दरी वाढलेली असेल. काही गोष्टींना कोरोना निमित्त जरी असला तरी देशाची वाटचाल ही वाढती 'आहे'ना घेऊन महासत्तेकडे जाणारी असेल तर इंडिया आणि भारत या दोन गटात भाषेच्या मात्र 'वाद' आणि 'भेद' होऊन त्यात अधिक भेद झाला आणि होणार आहे. अशा अनेक समस्यांना साहित्याने आपले विषय तर बनविले आहेतच आता नव्याने, नव्या संदर्भात रेखाटण्याची आवश्यकता भासणार आहे.

अमेरिकेत सारख्या आर्थिक महासत्ता असलेल्या देशाची कोरोनामुळे दाणादाण उडाली. लॉकडाउन करावयाचे की नाही याबाबतही देशात एकमत होत नव्हते. कोरोनासारख्या जागतिक महाभयंकर महामारीतही अंतर्गत पक्ष देशहीत न बघता राजकारण महत्त्वाचे मानतात ही खुर्चीची लालसा जरी आपल्याला अमेरिकेत पहायला मिळाली तरीही ती महाराष्ट्रातही अनुभवायला मिळाली. देशहीत बाजूला ठेवून खुर्चीसाठी राजकारण करणारे चेहरे हल्लीही आपण पाहिले. देशावरील संकट आणि जनतेचे दुःख यांच्याशी काडीमात्र संबंध नसलेल्यांचे चेहरेही समोर आले. लॉकडाउनमुळे कित्येक कामगार शहरामध्ये अडकले आणि जीवनाची वाताहत सुरू झाली. आपल्या श्रमाने फुलविणाऱ्या शहराने त्यांना उपासमार घडवायला सुरुवात केली. कुणीही जबाबदारी घ्यायला तयार नाही. अनाथ झालेली, उपाशी पोटाने, अनवाणी पायाने गावाकडे निघालेली ही माणसं कधी रेल्वेने चिरडली तर कधी ट्रकच्या चाकाखाली आली. अशा विदारक अवस्थेने कवींचे मन अस्वस्थ होते. शहराने नाकारलेल्या माणसाला आपल्या गावाची ओढ लागली. संसाराची गाठोडी पाठीवर घेऊन, घायाळलेल्या मनाने जगण्याचा तग धरण्यासाठी आयुष्यात उभारलेली ही माणसे रस्ता तुडवत गावाकडे निघाली. ही मन विदीर्ण करणारी सत्यस्थिती कवितेचा विषय झाली नसती तर नवलच. कोरोनाने कोलमडून पडलेल्या माणसाच्या आयुष्याचे चित्र रस्ते तुडवताना अंगावरून वाहणाऱ्या आसवांना शब्दबद्ध करताना अस्वस्थ होऊन प्रख्यात कवी प्रा.अशोक ढाळे म्हणतात,

"रस्ते वेदनेने भिजलेत आहेत।
पोटाची भूक वाटणीस घेऊन
माणसं मृत्यूच्या दारी ओढली जाताहेत.



Scanned with CamScanner

कुठलाही ओलावा उरला नाही तेव्हा,

माणसं मरणाचे मुहूर्त शोधताहेत."

खरं म्हणजे आयुष्याने ग्लेन कोरोनाने लॉकडाउन केले आहे आणि जे आहेत तेही भकास असे भेगाळलेल्या पायांसारखे, ओलावा आटलेले आणि जगणेच गमावलेले; जणू मरणाचा मुहूर्त शोधणारे. शेकडो किलोमीटर अन्न–पाण्यावाचून चालणाऱ्या ओठींचे विवंचनेच्या या माणसांना गावाने तर सोडाच पण त्यांच्या कुटुंबानेही स्वीकारले नाही. रणरणत्या उन्हात डांबरी रस्त्याच्या मुलाच्या वेदना पाहून आईचा पान्हा आटला तेव्हा माणुसकीच्या मर्यादा समजल्या. आई मुलाला स्वीकारायला तयार नाही. पती पत्नीला हात लावायला तयार नाही. मुलानी जन्मदाते भक्ती, अन्यथा तर सोडाच 'बॉडी' न्यायलाही कोणी तयार नाही. कोण कुठल्या पायाखाली आता माणसांनी संख्या दिसली संपू लागली. केव्हा लक्षात आले की माणसांची संख्या फार वाढली. स्वच्छ आणि सधन देशांमध्ये कोरोनाने नैसर्गिक स्वभावाने आपले पटापट हजार पाय पसरविले. माणसे संपू लागली पण माईंड याने वाटले की माणुसकीही कोरोनाने संपविली. माणसे, समाज नश्वर असले तरी शाश्वत आहे ती माणुसकी; जीच कोरोनाला सळो पळो या संकटकालीन मानवजातीचे हे सर्वात मोठे नुकसान असेल. याविषयी भविष्यात येणाऱ्या काळात साहित्याने विचार होईल.

कोरोनाने जग पुढे जात असताना काही विधायक परिणामही निश्चितच होणार आहेत. त्यासाठी सर्वांना पुढील काळात साहित्य सांगेल की सकारात्मकता अधिक माणसांना मानवतेच्या नात्यामध्ये बांधू पाहणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये दिसली. शहराच्या नांदगीत उत्पादनशीलतेमध्येही अनुभवायला मिळाली. कोरोना वॉरियर्सने समाजाप्रती बांधिलकी व्यक्त केली. महायुद्धातील योध्याप्रमाणे तेही योद्धे आहेत. इतिहासाला याची सर्व ज्ञात राहील. कोरोनाच्या लॉकडाउनमुळे ओझोनचा थर वाढलेला आहे, पर्यावरणाची पातळी घटली, हवा शुद्ध झाली, माणसेही निरोगी झाली, एकूण कोरोनाने सर्वच तेवढा पर्यावरणाला फायदा झाला. ही गोष्टही आपल्याला मिळाली. कोरोनामुळे जगाची पुनर्बांधणी होईल. माणसामाणसातील संपर्कापेक्षा अदृश्य संपर्कावर जगण्यासाठी चालविण्याचा प्रयत्न होईल. माणसापेक्षा यंत्रांना आणि रोख व्यवहारापेक्षा कॅशलेस व्यवहाराला (बीट कॉइन मार्फत आभासी करन्सी, भीमयुद्धा डिजीटल म.एट. नावाची करन्सी आणणार आहे.) अधिक महत्व राहणार आहे. माणसाचे महत्व कमी होऊन यंत्रमानव काम करतील. रोबोट माणसाची जागा घेईल. दैनंदिन कार्य सुकर होत असल्याने माणसातील भावना आणि मनाला फारसे महत्व राहणार नाही. माणूसही यंत्रवत होईल. भारतीय राज्यघटनेने रस्त्यावरील माणूस राजभवनात नेला आणि पगपगत राजांना रस्त्यावर आणून सामान्यांचे राज्य अस्तित्वात आणले मात्र आता राज्यकर्त्यांपासून सर्वसामान्य दूर होऊन कागदावर लोकशाही आणि प्रत्यक्षात भांडवलशाही येण्याची सुरुवात होईल. खाजगीकरणात सामान्य माणूस गहाळ होताना आपण पाहिलेला आहे. ऑनलाईन आणि ऑफलाईन शब्दांच्या वेबाड प्रसारमाध्यमच भन्नाट कार्यपद्धतीही अस्तित्वात येईल. या सर्व प्रक्रियेत त्रुटींचा आणि सत्याचा सत्य शाबूत रहावा म्हणजे लोकशाहीला उदंड आयुष्य लाभल्यासारखे होईल. अभिव्यक्ती आणि प्रसारमाध्यमांची गळचेपी होवू नये याचाही साहित्य अंदाज घेईल. साहित्य हे जसे लोकशाही बळकट करण्याचे, सर्वसामान्यांच्या जीवनाला



CS Scanned with CamScanner

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

अविष्कृत करून सत्कार करणारे सत्कारपीठ आहे तसे ते भुकेलेल्यांना सत्याचा आरसा व सत्य दाखविणारे साक्षी आहे.

कोरोना प्रश्नात जगाचे प्रतिबिंब साहित्यात उमटणार आहे. कारण कोरोना ही या शतकातील आणि जीवंत असलेल्या जीवांच्या जीवनातील मरणापर्यंत न विसरणारी अपूर्व अशी विस्मरणीय घटना आहे. विश्वा सभोवतालच्या परिणामांनी सर्वच प्रभावित झाले आणि होणार आहेत. समाज अस्वस्थ होऊन निघाला आहे. अशा समाजाच्या स्थितीगतीचा आलेख साहित्य मांडत असते. समाजात घडणाऱ्या घटनांचे केवळ वर्णन करण्यापेक्षा भविष्यातील समाजाचे चित्र साहित्य आरेखित करत असते. म्हणूनच कोरोना ओसरल्यानंतरही कोरोनाची अवाढव्य साहित्य निर्माण करेल. ज्या गोष्टी दोन महायुद्धांनी आणि हजार वर्षांनी दिसल्या, नसल्या नाहीत. कोणत्याही प्रसंगाने समोर आल्या नाहीत अशाही काही मानवी नात्यातील अदृश्य गुंतागुंत आणि माणसाच्या भौतिक बदलांसोबतच मानसिक बदल साहित्य चितारणार आहे. अस्मितेला वेध आणि कोरोनोत्तर जगाला नव्या संदर्भासह जगण्याचा पायवाट साहित्य देणार आहे. असा हा कोरोना आणि मराठी साहित्याचा सहसंबंध असणार आहे.

**निष्कर्ष**

१. कोरोनाने जगाला क्षणभंगुरता आणि हतबलतेची जाणीव दिली.
२. कोरोनाच्या संकटाने साहित्याला नवे विषय दिले.
३. मराठी साहित्यामध्ये कोरोनापश्चात समाजाचे चित्रण वेगळे राहील.
४. या वळणासाठी पुढे एक विशिष्ट टप्पा मानल्या जाईल.


**संदर्भ ग्रंथ**

१. आणखी काही कविता — बा. सी.मर्ढेकर.
२. संत नामदेवांची गाथा— सरकारी प्रत
३. महात्मा फुले समग्र वाङ्मय— संपादक हरी नरके.



CS Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

2020-21




CHIEF EDITOR
Dr. Anil Dodewar

EDITORS
Prof. Akash Bele

EXECUTIVE EDITORS
Dr. Radhesham Choudhari
Prof. Naresh Mahajan
Prof. Suyog Mankar

PUBLISHED BY :
UPA Group Publication in Association with University Professors' Association. 38, Mitra Nagar, Manewada Cement Road, Nagpur-24.

CORPORATE OFFICE:
38, Mitra Nagar, Manewada Cement Road, Nagpur-24.

PUBLICATION :
The UPA Interdisciplinary e-Journal is published Bi-annually.

© All Rights Reserved.
The views expressed in this publication are purely personal judgments of the authors and do not reflect the views of Journal or the body under whose auspices the journal is Published.

## SPECIAL ISSUE – III : JUNE - 2020

For downloading the Issue, Click the link given below
http://upa.org.in/ejournal_june_2020
Visit : www.upa.org.in

Share your valuable feedback at
upanagpur@gmail.com
upajournal@gmail.com

## UPA National Peer-Reviewed Interdisciplinary e-Journal

UPA

Published By
UPA Group Publication
In Association With



June - 2020

| | | |
|---|---|---|
| | **Ms. Shalini Ratneshwarprasad Singh**<br>R.D.I.K & Ny K.D. College, Badnera Rly, Amravati (M.S) India | pH Metric Studies on Formation Constants of the Complexes of Substituted Thiazine with Some Transition Metal Ions in 70% Dioxane-Water |
| | **Dr. Kishor Babanrao Raulkar**<br>Vidya Bharati Mahavidyalaya Camp, Amravati | Study of Effects of Non-Partical of ti02 on changing electrical properties of Polyperrole Composites |
| | **Prof. Vibrant Krushnarao Meshram**<br>V.N.Mahila Mahvidyalya Pusad.Dist Yavatmal | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार चळवळी विषयी मातृत्व |
| | **Dr. Narayansingh Ranjitsingh Varma**<br>Smt.V.N.Mahila Mahavidyalaya Pusad | Manavi Haaq ani Hinsa ek etihasikh Aadhayan |
| | **Prof. Laxman Babarao Yadao**<br>B.D.P. COLLEGE PARWA | Coronache Bhartatil Sankramaan : Ek Drushtikshep |
| | **Dr. Sudha Murlidhar Khadke**<br>Loknayak Bapuji Aney Mahila Mahavidyalaya YAVATMAL | मानवाधिकार व भारतीय महिला पुढिल आव्हाने - समाजशास्त्रीय अध्ययन |
| | **Dr. Sarita Uttamrao Chandankar**<br>Smt.V.N.M.M.Pusad | Human rights of women in India |
| | **Dr. Vinod Punjaramji Wanjari**<br>Zulekha College, Nagpur | |
| | **Dr. Ravi Prakash Chapke**<br>Ravi Chapke | Corona Covid-19:A Present Scenario ofTreatment |
| 1 | **Mr. Vishwanath Pandurang Hissal**<br>Shri Vasantrao Naik Arts and Shri Amarsing Naik Commerce College Mangrulpir, Dist.- Washim Maharashtra 444403 | Covid-19: Its Impact on the Various Structures od Social Interrelationship |
| 2 | **Dr. Ved Ramesh Patki**<br>Indira Mahavidyalaya, Kalamb | Overview of Current Situation of Covid-19 pandemic in Yavatmal District |
| 33 | **Mr. Sandeep Bandulal Agrawal**<br>Babasaheb Deshmukh Parwekar Mahavidyalaya, Parwa. | Mother - Daughter Relationship in Dattani\'s Plays |
| 34 | **Mr. Abhinav Gajanan Futane**<br>Shri Shivaji College of Agril. Biotechnology, Amravati | Corona : Lockdown Aani Krushi Samasyaa |
| 35 | **Mr. Yogesh Chintaman Patle**<br>SHIVRAMJI MOGHE ARTS, COMM & SCI. COLLAGE KELAPUR, DIST-YAVATMAL | Commerce |
| 36 | **Mr. Akshay Gangadhar Kachore**<br>Shivramji Moghe Arts, Commerce & Science College, Pandhakawda | |
| 37 | **Mrs. Shaila Piyush Nibjiya**<br>Brijlal Biyani Science College, Amravati | Silver Lining of Opportunities during the Dark Clouds of Pandemic |
| 38 | **Dr. Nandkumar Ganeshrao Bhakare**<br>Arts and Commerce College Boriarab | |
| 39 | **Dr. Neeta Nandlal Tiwari**<br>Shri Dhabekar Kala Mahavidyalay Khadki Akola Maharashtra | कोविड -19 एक आपदा भी, एक अवसर भी |
| 40 | **Dr. Ramesh Pundlik Deshmane**<br>SPMTM Arts and commerce college chikhli Dist:buldana | E-commerce sector increased and Investment |
| 41 | **Dr. Anand Dattatray Bhosale**<br>G. S.science, arts and commerce college khamgaon district buldhana -444303 | Covid-19 transforming challanges in to opportunity |
| 42 | **Dr. Sanjay Jagannathrao Shenmare**<br>Shivshakti Arts, Commerce College, Babhulgaon | Technology tool\'s to engage students in the classroom for more productive future in the IT era |
| 43 | **Dr. Santosh Tukaram Kute**<br>Smt.Sindhutai Jadhao Arts & Science College Mehkar | [illegible] |

2020-21

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

# AJANTA

Volume - IX, Issue - II,
April - June - 2020
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २१. महात्मा जोतिबा फुले व सत्यशोधक चळवळ

**प्रा. डॉ. जगदिश दयासागर हेंडवे**
इतिहास विभाग प्रमुख, बाबासाहेब देशमुख, पारवेकर महाविद्यालय पारवा.

महात्मा जोतीबा फुले यांनी आपले व्यक्तिमत्व स्वयंप्रेरणेने व स्वप्रयत्नांनी घडवले. ज्योतीबा कृतीशील क्रांतिकारक होते. आधुनिक भारतात १९व्या शतकात समाजप्रबोधनाचे युग सुरु झाले होते. त्याचा परिणाम व्यक्तीस्वातंत्र्य, मानवतावाद, वैज्ञानिकता, सामाजिक व धार्मिक दास्यातून मुक्तेचा विचार, लोकशाहीची संकल्पना इत्यादी संबंधीत विचार बळकट होण्यास मदत झाली. तत्कालीन विचारवंतात महात्मा फुले वेगळे होते. त्यांच्या विचारांची दिशा व संदर्भ वेगळे होते. जोतिबांनी क्रांतीवादी विचारसरणीचा पाया घातला.

तत्कालीन समाजात कमालीची विषमता अस्तित्वात होती. समाजाचे वर्गनिहाय झालेले विभाजन आणि त्यातून निर्माण झालेली सामाजिक, आर्थिक विषमता महात्मा फुल्यांना प्रकर्षाने जाणवली. या समाजात मूठभर लोकांच्या हाती सामाजिक वर्चस्व आणि सत्ता केंद्रीत झाली आहे. हाच वर्ग समाजातील बहुजनांची सामाजिक व आर्थिकदृष्ट्या पिळवणूक करीत आहे, हे जोतिबांच्या लक्षात आले होते. या सामाजिक व आर्थिक वर्चस्वाचे मूलाधार आणि त्यातून निर्माण होणाऱ्या अन्यायाचे स्वरूप यांचे विश्लेषण करण्याचा फुल्यांनी प्रयत्न केला.

जोतिबांनी महाराष्ट्रात ब्राह्मणांच्या मानसिक गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गांना मुक्त करण्याचा महत्वाकांक्षेने प्रेरित होवून चळवळ सुरु करण्याचा निर्धार केला. जोतीबा हे क्रांतिकारी पुढारी असल्याने त्यांच्या विचारांशी सुसंगत व धोरणाला पोषक असे तत्वज्ञान व व्यासपीठ निर्माण करणे त्यांना क्रमप्राप्त होते. पुरोहिताकडून होणाऱ्या अन्याय, अत्याचारापासून, गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणीव करून देणे हे फुल्यांचे ध्येय होते. हेच ध्येय पुढे स्थापन करण्यात आलेल्या सत्यशोधक समाजाचे होते.

महात्मा जोतीबांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. 'सर्वसाक्षी जगत्पती त्याला नकोच मध्यस्ती' हे सत्यशोधक समाजाचे घोषवाक्य होते. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागायतील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक, भांडणे अनेक कशासाठी' हा विचार जोतिबांनी परखडपणे मांडला, त्यांनी देवाविषयी किंवा निसर्गाविषयी निर्मिक शब्द वापरला. यावरून सत्यशोधक समाज व जोतीबा आस्तिक होते हे सिद्ध होते. एकोणिविसाव्या शतकाच्या मध्यात भारतात समाजसुधारकांनी पाश्च्यात सुधारणेचे स्वागत केले. याकाळात महाराष्ट्रात तीन विचारप्रवाह प्रामुख्याने अस्तित्वात होते. पहिला प्रवाह हा धार्मिक सुधार्कांचा होता. या प्रवाहात ब्राह्मो समाज व प्रार्थना समाज यांचा समावेश होता. न्यायमूर्ती रानडे, रामचंद्र गोपाल भांडारकर, विठ्ठल रामजी शिंदे, या सारखी मंडळी यात अग्रणी होती. तर दुसरा प्रवाह बुद्धिवादी ब्राह्मण सुधारकांचा होता. या प्रवाहात आगरकर अग्रभागी होते. आणि तिसरा सर्वात मोठा प्रवाह, ब्राह्मणी संस्कृती व विचारांच्या विरुद्ध बंड करणाऱ्या बहुजनसमजाच्या चळवळीचा होता. याचे आद्यजनक जोतीबा फुले होते.

चातुरवर्णाचे तत्वज्ञान अथवा जातीभेद ही संस्था व्यक्तीविकासाला मारक व एकात्म समाजाच्या घडणीत ठरली आहे. तीचे समूळ उच्चाटन व्हावे असे स्पष्ट जोतिबांचे होते नव्हे तर सत्यशोधक चळवळीच्या कार्यक्रमात अग्रक्रमाने समावेश केला. त्यापूर्वी सामाजिक परिवर्तनाची नितांत गरज होती. त्याकरीता सर्वप्रथम स्त्री शिक्षण स्वातंत्र्याचा पुरस्कार करणे अपरिहार्य आहे. महाराष्ट्रातील बहुजन समाजातील सुधारकांचे,ब्राह्मणेतर सुधारकांचे मागासलेल्या बहुसंख्य जनतेच्या जीवनाशी निगडीत होते. तर ब्राह्मण सुधारकांचे प्रश्न पांढरपेशा उच्चवर्णीयांच्या संबंधीत होते. शुद्रातिशुद्रांच्या उद्धारासाठी महात्मा फुल्यांनी स्वतंत्र, स्वावलंबी व पुरोगामी विचारांची 'सत्यशोधक स्थापन केली.

महात्मा जोतीबा फुले यांच्या उच्छेदक प्रवृत्तीला अनेक करणे आहेत. यातील महत्वाचे कारण म्हणजे उत्तरार्धातील ब्राह्मणी वर्चस्वाचा काळ होय. याकाळात ब्राह्मणी राज्यात जातीभेदाची तीव्र अंबलबजावणी, बहुजन दडपण्याची राज्यकर्त्यांची प्रवृत्ती, शुद्रांची, अस्पृश्यांची पिळवणूक, कायद्यांच्या अंमलबजावणीतील शितीलता, पक्षपात, भ्रष्टाचार अशी बेबंदशाही व अनागोंदी व्यवस्था अस्तित्वात होती. त्या काळात महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी सामाजिक जीवनात ब्राह्मणाचे वर्चस्व होते. तसेच धार्मिक व प्रशासकीय अधिकारावर त्यांचेच वर्चस्व होते. परंपरा धर्माच्या चौकटीत संपूर्ण समाज गुरफटला होता. याचा प्रवर्तक व समर्थक ब्राह्मण वर्ग होता.या चौकटीत विरुद्ध बंड जोतिबांनी निर्माण करून समाज जागृतीचा प्रण केला. सत्यशोधक समाजाच्या रूपाने जागृती करून मानसिक गुलामगिरी करण्यासाठी महात्मा जोतीबा फुले यांनी धगधगती मशाल हाती घेतली. त्यांनी समाजातील अनिष्ठ प्रवृत्ती विरुद्ध आघाडीवर युद्ध पुकारले होते.

महात्मा फुल्यांनी सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथात सत्यशोधक समाजाच्या तत्वाची मांडणी केली. स्वातंत्र्य, बंधुत्व यांच्या पायावर अवघ्या मनुष्य जमतीचे एक कुटुंब निर्माण करणे हे मनुष्य तत्वाचे सर्वोच्च ध्येय होय असे ठाम मत होते. सर्व मानव, स्त्री व पुरुश यांचे हक्क समान आहेत. मानवाला कोणत्याही मानवसमुदायावर स्वामित्व वर्चस्व गाजविण्याचा अधिकार नाही. प्रत्येकाला स्वमताचा प्रसार करण्याचा हक्क व अधिकार आहे. शेती, कलाकौशल्य मजुरी हि कामे माणसात कमीपणा अथवा हीनपणा आणीत नसून त्यांच्या ठिकाणी थोरवीच सिद्ध करते. या जगण्याकरिता आणि उपभोगाकरिता वस्तू निर्माण करणे किंवा मिळविणे हे प्रत्येक मानवाचे आद्यकर्तव्य आहे. परस्परांना सहकार्य करणे हाच मानवाचा श्रेष्ठ धर्म आहे. असे स्पष्ट मत महात्मा फुल्यांचे होते. यातून हे सिद्ध होते जोतीबांनी समाजातील सर्वप्रकारची विषमता नष्ट करण्यासाठी सत्यशोधक समाजाचे अस्त्र आपल्या हाती घेतले होते अस्त्राने समाजातील विषमता कायमची नष्ट करून समाजात 'मानवतावाद' निर्माण करण्याचा जोतिबांनी आटोकाट प्रयत्न केले

बायबलमध्ये येशू ख्रिस्त यांनी माणसाने माणसाशी कसे वागावे यासंबंधित केलेला उपदेश माणसाने आणला तर मनुष्य जातीचे जीवन पूर्ण सफल झाल्याशिवाय राहणार नाही. फुल्यांनी विशद केलेले सत्य म्हणजे ज्ञानाचे सार आहे. शुद्ध सत्य हे कोणत्याही धर्मग्रंथात अथवा ऋषी, गुरु, अवतार, ईश्वर, प्रेषित या कोणामध्येही नाही. ते मनुष्य सदसदविवेकबुद्धीत आहे. निसर्गाने मानवजातीला दिलेली ती अनमोल देणगी होय. महात्मा फुले यांनी सत्य

समाजाविषयाची ही तात्विक बैठक पूर्णतः बुद्धिवादी आहे. त्यांना समाजावरील धर्मसंस्थेचे वर्चस्व मान्य नव्हते. तर फुल्यांना सृष्टीनिर्मात्याचे अस्तित्व मान्य होते.

**सत्यशोधक समाजाचे कार्य व उपक्रम**

**सर्वसामन्यांचे कैवारी**

सत्यशोधक समाजाने लोकशिक्षणा बरोबरच शेतकऱ्यांची जमीनदार व सावकारांच्या मगरमिठीतून सुटका करण्यासाठी सतत प्रयत्न केले. शेतकरी हा समाजाचा पोशिंदा असून देशाचा मुल आधारस्तंभ आहे. या शेतकऱ्यांची अवस्था भट भिक्षुक, गुजराती, मारवाडी, ब्राह्मण, सावकार, सरकारी नोकरवर्ग यांच्या शोषणाने अत्यंत बिकट झाली होती. शेतकऱ्यांच्या पिडीत व शोषित जीवनाचे वास्तविक चित्र फुल्यांनी गुलामगिरी व शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथात व्यक्त केले आहे. शेतकरी अज्ञानी असल्यामुळे दरिद्री आहे. सरकारने त्यांना शिक्षण द्यावेत. शुद्र पंतोजींची नियुक्ती करावी. शेतीकरिता शेतकर्यांना अनेक सोई व सवलती देण्यात याव्यात. सिंचनासाठी तलाव, कालवे, बंधारे, विहिरी इत्यांदींची व्यवस्था करावीत. शेतकऱ्यांसाठी शिक्षणांची व्यवस्था करावी. त्याकरिता सरकारी शाळा सरकारने सुरु कराव्यात. अशा प्रकारे महात्मा फुले यांनी सरकारी दरबारात मागणी केली होती.

महात्मा फुलेंच्या मागणीमुळे सरकारने 'डेक्कन एजुकेशन रिलीफ कायदा' सरकारने पास केला. दिनबंधू मित्र या वृत्तपत्रात कामगारांच्या समस्यांना वाचा फोडण्यात आली. परिणामी सरकारला कामगारांना सुविधा देण भाग पडले. कामगारांच्या सुधारणामध्ये दिनबंधू मित्र या वृत्तपत्राचे मोठे योगदान आहे. नारायण मेघाजी लोखंडे या मिल कामगाराने 'मिल हँड असोसिएशन' ची स्थापना केली. या संघटनेद्वारे त्यांनी फॅक्टरी आयोगासमोर कामगारांचे प्रश्न मांडले. महात्मा जोतीबा फुले यांचा सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ सत्यशोधक चळवळीचा आत्मा होता.

महात्मा जोतीबा फुले यांनी १८७९ साली पुणे येथे एकास थियटरमध्ये स्त्रियांच्या निबंध वाचनाचा कार्यक्रम आयोजित केला. तर १८८० मध्ये बारामती तालुक्यातील चिंचोली या गावात शेतकऱ्यांची सभा आयोजित केली. या सभेत शेतकार्याच्यास दैनावास्थेबद्दल पिळवणूकीबद्दल वाचा फोडून त्यावर उपाययोजन सुचविणारे ठराव मांडले. यात शेतसारा, जंगलत्रास, कर्ज, सक्तीचे शिक्षण इत्यादी ठराव पास करण्यात आले.

महाराष्ट्रातील अनेक शहरात सत्यशोधक समाजाची केंद्र निर्माण करण्यात आली. त्यामुळे समाजात जनजागृतीचा उपक्रमास मोठ्या प्रमाणात मदत झाली. जनजागृतीच्या, लोकशिक्षणाच्या चळवळीला वेग आला. या चळवळीत कृष्णराव पांडुरंग भालेकर, स्वामी रामय्या आय्यावरू, विश्राम रामजी घोले, तात्या पांडुरंग सावंत, नारायण मेघाजी लोखंडे, सदोबा गावंडे, रायभान जाधव, नलिनीताई लढके, प्राचार्य गजमल माळी, बाबा आढाव, भास्करराव जाधव, उत्तम नाना पाटील, राजश्री छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर पिराजीराव सरनाईक यासारख्या अनंत अशा लहानमोठ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी सत्यशोधक चळवळ नेटाने पुढे नेली. महात्मा फुले यांच्यानंतर राजश्री छत्रपती शाहू महाराज यांनी उभ्या महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळ वृद्धिंगत करण्यात मोलाचे योगदान दिले आहे.

शेती, शेतकरी, कामगार, मजुरांची दैनावस्था, स्त्रिया, अस्पृश्यांचे दारिद्र्य, सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता, धर्मचिकित्सा, सामाजिक पुर्नरचना, वंचित उपेक्षित सामाजघटकाचे विदारक चित्र, कामागारांचे लढे असे अनेक

प्रश्न महात्मा फुले व त्यांच्या सत्यशोधक समाजाने व सत्यशोधक चळवळीने समर्थपणे हाताळले होते. ... वैचारिक बंड फुल्यांनी केले होते. त्यांचा उद्देश स्पष्ट असल्यामुळे त्यामध्ये विचारांचे सामर्थ्य ठासून ... फुल्यांच्या लिखाणात झोंबणारा उपहास तीव्र होता. त्यातला आवेश, जोश विलक्षण आहे. सत्यशोधक चळवळी... करताना लक्षणशास्त्री जोशी लिहितात, "भारतातील तत्कालीन खेड्यापाड्यापर्यंत पोहोचलेली आधुनिक भारतातील चळवळ ही प्रबोधनकार चळवळ आहे. हजारो वर्षापासून पिचलेल्या आणि शोषित अशा कष्टकरी जनसमूहा... प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध मानवीपत आणि मानवी प्रतिष्ठा, विषमता, अज्ञान, आत्मोन्नती, शोषणमुक्ती याकरिता विशाल चळवळ होती,. स्वातंत्र्य समता, विश्वबंधुत्व, ममतेचा जागर आणि त्यातून एकात्म समाज सत्यशोधक ... अभिप्रेत होता.

आजही भारतात अशा प्रकारच्या चळवळीची नितांत गरज आहे. महात्मा फुले यांच्या विचारांची समाजा... असून निष्ठावंत कार्यकर्त्यांची समाजात वानवा आहे. शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आवासून उभे आहेत. त्यांच्या प्रश्नांना दरबारी आवाज उठविणारे जे कार्यकर्ते आहेत ते राजकीय पक्षांच्या दावणीला बांधले आहेत. महात्मा जोतिबांचे कार्य पु... पुढारी व सत्यशोधक चळवळीची आजही शोषित समाजाला आवश्यकता आहे. तरच महात्मा फुल्यांनी पाहिलेले ... वास्तवात उतरल्या शिवाय राहणार नाही.

**संदर्भ ग्रंथ**

१. धनंजय कीर - महात्मा जोतीबा फुले - पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
२. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ - आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक सांस्कृतिक प्रबोधन - प्रा. रं. ... गायधनी, नाशिक.
३. संपादक प्रा. हरी नरके - महात्मा फुले गौरव ग्रंथ - महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन, समिती महाराष्ट्रशास... मुंबई.
४. भास्कर लक्ष्मण भोळे - भारतीय साहित्याचे निर्माते, महात्मा जोतीराव फुले - साहित्य अकादमी.
५. महात्मा फुले – गुलामगिरी - प्रबुद्ध भारत प्रकाशन व्यवसाय नागपूर – १७.
६. शेतकऱ्यांचा आसूड- महात्मा जोतीराव फुले – युगसाक्षी प्रकाशन, नागपूर.
७. ब्राह्मणाचे कसब - महात्मा जोतीराव फुले - मिलिंद प्रकाशन, वर्धा.

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

An International Multidisciplinary
Quarterly Research Journal

ISSN - 2277 - 5730
Volume - IX, Issue – II, April - June - 2020

# AJANTA

Impact Factor - 6.399 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To


प्रा. डॉ. जगदिश दयासागर हेंडवे

In Recognition of the Publication of the Paper Titled

महात्मा जोतिबा फुले व सत्यशोधक चळवळ

**Ajanta Prakashan**
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

**Editor : Vinay S. Hatole**


Peer Reviewed Referred and UGC Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

2020-21

Volume - IX, Issue - III

July - September - 2020

English Part - II / Marathi / Hindi

Impact Factor / Indexing

2019 - 6.399

www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# ४. कोविड - १९ व शेतकऱ्यांची स्थिती

**प्रा. डॉ. जगदीश दयासागर हेंडवे**
इतिहास विभाग प्रमुख, बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ.

प्राचीन काळापासून भारत कृषीप्रधान देश आहे. भारतातील ग्रामीण जीवन शेतीवर अवलंबून आहे. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी ७० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहे. आजही भारतातील ६० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा, लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती असून संबंधित इतर व्यवसायी अस्तित्वात होते. प्राचीन काळापासून तर इंग्रजांपर्यंत जमीन महसूल हेच राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. त्यामुळे प्राचीन राज्यकर्त्यांनी शेतकऱ्यांना विविध सवलती देऊन विकासाची धोरणे राबविली होती. तर भारतात मुस्लिम सत्ता स्थापन झाल्यानंतरही मुस्लिम सत्ताधीशांनी सुद्धा भारतीय शेतकऱ्यांना सरकारतर्फे विविध सवलती दिल्या. प्राचीन मध्ययुगीन काळातील राज्यकर्त्यांना शेतीकडे लक्ष केंद्रित केले. त्यांनी शेतीच्या सिंचनासाठी तलाव, विहिरी, कालवे व धरणांची निर्मिती करून मोठ्या प्रमाणात शेती ओलिताखाली आनली परिणामी शेतीचा विकास झाला. उत्पादनात वाढ होऊन राज्याच्या तिजोरीत ही भर पडली एवढेच नव्हे तर शेतकऱ्यांना सरकार तर्फे बी–बियाणे खते अवजारे कर्ज उपलब्ध करून दिली. तर दुष्काळी काळात शेतकऱ्यांना सरकारकडून भरीव मदत दिली जात होती. एकंदरीत प्राचीन काळापासून तर मध्ययुगीन काळापर्यंत भारतीय शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती चांगली होती. तत्कालीन खेडी स्वयंपूर्ण होती देशाचा राज्याचा आर्थिक कणा शेती होती. प्राचीन काळापासून लोकजीवन स्वयंपूर्ण होते. गावातील गरजा गावातच भरविण्यात जात होत्या. गावा पुरते लागणारे उत्पादन शेतकरी घेत होते याचा कोणताही विचार त्यांना माहीत नव्हता बाहेरील बाजारपेठेशी त्यांचा फारसा संबंध येत नव्हता. परिणामी भारतीय लोकजीवन समृद्ध सुखी शांत होते. सामाजिक एकता नांदत होती. ग्रामीण सामाजिक जीवनाचा मूलाधार शेती होती. शिवाय अनेक लहान उद्योग प्रत्येक गावात अस्तित्वात होते. महाराष्ट्रात बारा बलुतेदार पद्धती व आठरा अलतेदार होते. वस्तुविनिमय पद्धतीनेच व्यवहार चालत असे. सुतार, लोहार, कोळी, माळी, चांभार, कुंभार, नाव्ही असे अनेक व्यवसाय अस्तित्वात होते.

शेतीला पूरक व्यवसाय पशुपालन होता. एकंदरीत प्राचीन काळापासून इंग्रजांच्या काळापर्यंत भारतीय शेतकरी व मजूर वर्ग सुखी होता. भारतात परकीय सत्तेचे आगमन झाले आणि भारतीय सत्तेचे स्वरुप बदलले यात इंग्रजांनी शेती महसुलाचा विविध योजना अमलात आणून त्यांना त्यातून प्रचंड कर वसूल केला. इंग्रजांनी कायमधारा जमीन महसूल पद्धती, रयतवारी पद्धती व महालवारी पद्धती अमलात आणून शेतकऱ्यांचे प्रचंड शोषण केले. एकंदरीत इंग्रजांना भारतीय सामाजिक आर्थिक व राजकीय व्यवस्था मोडून काढायची होती. त्यांना प्रचंड यशही मिळाले आहे. ते असे असले तरी प्राचीन काळापासून तर भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत

शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे उदाहरण सापडत नाही. इसवी सन १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि भारतात नवीन राज्यघटना अस्तित्वात आली. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा हा शेतकरी राज्यघटनेने दिलेल्या स्वातंत्र्यापासून शेतकरीवर्ग वंचित राहिला आहे. शेतकऱ्यांना राज्यघटनेने मूलभूत हक्क दिले असले तरी तेथे सावकार ,व्यापारी, दलाल यांनी नेहमीच शेतकऱ्यांची रक्त शोषले आहे शोषण करीत आहे. त्यांनी उत्पादित शेतमाल बाजारपेठेत विकण्याचे स्वातंत्र नाही. त्याच्या मालाची किंमत त्याला ठरविता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. याउलट उद्योगपती, भांडवलदार, कारखानदार हे उत्पादित केलेल्या वस्तूंची किंमत ठरवतात व अवाजवी नफा मिळवतात. शेतकरी आपल्या मालाची किंमत ठरवून तो माल  बाजारपेठेत विकण्याचे स्वातंत्र या वर्गाने हिरावून घेतले आहे. उलट त्यांच्या शेतीसंबंधित वस्तू उदाहरण बियाणे, खते, रासायनिक औषधी आणि शेती संबंधित इतर साहित्य खरेदी करताना मोठ्या प्रमाणावर किंमती आकारुन  प्रचंड आर्थिक शोषण केले जात आहे. त्यामुळे आर्थिक स्थिती अत्यंत खालावलेली आहे. स्वातंत्र्यानंतर लोकसंख्येत वेगाने वाढ झाली. शेतीवर गेले दिवसेंदिवस शेतकऱ्यांना शेतमजुरांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. लोकसंख्या वाढली भूमी कशी वाढणार? परिणामी असलेल्या शेतजमिनीचे लहान–लहान तुकड्यात विभाजन झाले. परिणामी अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला.

सावकार, व्यापारी, दलाल आणि निसर्गाने शेतकऱ्यांवर अन्याय केला आहे. वाढत्या लोकसंख्येचा शेतीवरील भार वाढल्यामुळे शेतकऱ्यांनी पडीत जमिनी लागवडीखाली आणल्या शिवाय अनेक जंगलतोड करून तेथेही शेती करायला सुरुवात केली. परिणामी मोठ्या प्रमाणात वृक्षांची तोड करण्यात आली. पर्यावरणाचे अतोनात नुकसान झाले. स्वातंत्र्यानंतर मोठ्या प्रमाणात यंत्रणांवर चालणाऱ्या उद्योगधंद्यांची वाढ झाली या कारखान्यांना जमिनीची आवश्यकता असल्याने मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली. या कारखाण्यांनी दूषित पाणी सोडल्यामुळे पाण्याचे मोठ्या प्रमाणात जल प्रदूषण झाले. शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा व औषधांचा वापर केल्यामुळे शेतीची उत्पादन क्षमता कमी–कमी होत गेली. एकंदरीत याचा परिणाम शेतकऱ्यांवर झाला. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती खालावल्यामुळे  मुलांचे शिक्षण व इतर कारणासाठी त्यांना कर्ज काढावे लागले. दिवसेंदिवस शेतऱ्यांवरील कर्जाचा डोंगर वाढतच गेला.परिणामी आत्महत्या सारखा मार्ग अवलंबून आपले जीवन संपविले.

सध्या जगात कोरोना हा संसर्गजन्य आजाराने मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला आहे. जगातील लोक मृत्यूमुखी पडले आहेत. आणि पडत आहेत. महाराष्ट्रात जेव्हा कोवीड–१९ या आजाराची सुरुवात मिळाली तेव्हा शेतकऱ्यांचा शेतमाल बाजारात विकण्यास तयार झाला होता. त्यात कापूस, ज्वारी, इत्यादी पिके शेतकऱ्यांनी घेतली होती. ही पिके बाजारपेठेत विकायला आणणार तर सरकारने लॉकडाऊनची घोषणा केली. परिणामी शेतकऱ्यांचा भाजीपाला, फळे खराब झाली. परिणाम शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. ज्यांनी आपल्या भाजीपाला बाजारपेठेत नेला असता तो माल खरेदी करण्यास तयार नव्हते. अशी अवस्था शेतकऱ्यांची झाली होती. शेतकऱ्यांचा माल साठवण्यासाठी सुविधांचा पूर्ण अभाव

आहे. मात्र उद्योगपती, कारखानदार ,भांडवलदार यांचा माल ठेवण्यास मोठ्या प्रमाणात गोदामांची निर्मिती करण्यात आली आहे. मात्र शेतकऱ्यांचा माल सुरक्षित ठेवण्यासाठी देशात कोणतीच व्यवस्था नाही. शेतकरीवर्ग खरेदीदार व बाजारपेठांचा बळी ठरला आहे आणि ठरत आहे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमाल विक्रीचे पूर्ण स्वातंत्र्य द्यायला हवे मात्र तसे होताना दिसत नाही. म्हणून अनेक वेळा बाजार भावात शेतमाल विकून नुकसान सहन करण्यापेक्षा रस्त्यावर फेकून देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली. शेतकरी हा देशातील लोकांना अन्न पुरवतो आहे. तो देशाचा खरा आधारस्तंभ आहे.

कोरोना काळात या शेतकऱ्यांनी गरिबांपासून तर टाटा, बिर्ला, अंबानी पर्यंतच्या सर्व लोकांना जगविले आहे. कोरोना काळात जनतेने आपल्या जवळ पैसा, सोने, किंवा इतर वस्तु खाल्ल्या नाहीत. तर शेतऱ्यांनी शेतीतून पिकलेल्या मालापासून त्यांचा उदरनिर्वाह झाला. मात्र येथील सरकार, सावकार, व्यापारी, उद्योगपतींचे डोळे उघडत नाही हीच शोकांतिका आहे .शेतकऱ्यांना आपला माल अत्यंत कमी किमतीत विकावा लागला आहे. यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले. देशात पंतप्रधानांनी वीस लाख कोटींचे पॅकेज जाहीर केले आहे पण याचा कोणताच फायदा शेतकऱ्यांना मिळणार नाही ही वस्तुस्थिती आहे. बड्या उद्योगपतीचे व व्यापाऱ्यांचा हिताचेच धोरण सरकार अमलात आणले जाते. हेच उद्योगपती व व्यापारी, राजकीय पक्षांना मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य करतात. त्यांच्या सहकार्याने राजकीय पक्ष बहुमतात निवडून येतात व सरकार स्थापन करतात. मात्र शेतकरी, मजूर व लहान उद्योग करणारे लोक सरकारच्या धोरणा पासून वंचित राहतात. ही देशाची वास्तविक परिस्थिती आहे. यात कोणाचेही दुमत असू शकत नाही. ही देशातील आर्थिक विषमता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. भारतात संतुलित धोरण राबविले जात नाही.

जगाचा पोशिंदा शेतकरी वर्ग असून त्याला आत्महत्या सारखा मार्ग का अवलंबावा लागतो. याचे राज्यकर्त्यांनी चिंतन करणे गरजेचे आहे. मोठ्या उद्योगपतींना बँकाकडून कोणत्याही कारणाशिवाय अरबो रुपयाचे कर्ज दिले जाते व कर्ज परतफेड न करता दिशाभूल करून पळून जातात असे अनेक उदाहरण देता येईल. शेतकऱ्यांकडे कर्ज थकीत झाले तर बँका त्यांना वारंवार नोटीस पाठविते आणि ते वसुली करण्यासाठी तगादा लावतात. पर्यायाने त्यांना सावकाराकडे जावे लागते. सावकार त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांचे शोषण करतात. अशा चक्रव्युवहात शेतकरी सापडला आहे. म्हणून महाराष्ट्रात त्याच्यातही यवतमाळ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. आजही दररोज तीन ते चार शेतकरी आत्महत्या करीत आहे. हेच सरकारच्या लक्षात येत नाही.

कोरोना काळात शहरी भागातून लाखो लोक ग्रामीण भागात परत आलेले आहेत त्यामुळे परत पुन्हा शेतीवर भार वाढणार आहे. ही वास्तविकता नाकारता येत नाही. शेतमजुरांना जी मजुरी मिळते त्यापेक्षा कमी मजुरीवर त्यांना काम करावे लागणार आहे. यापुढील काळात शेतकरी हिताच्या धोरणाचा अवलंब करणे गरजेचे आहे ग्राहकांना प्रत्यक्ष शेतकऱ्यांकडील माल खरेदीसाठी संधी द्यावी. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती मजबूत करायची असेल तर त्यांचा मालाचा किंमत ठरविण्याचा अधिकार द्यावा लागेल. शेती माल ठेवण्यासाठी शीतगृहे व गोदामांची व्यवस्था करावी लागेल. शेतमाल उत्पादन संघटनांचे जाळे निर्माण करावे

लागेल. शेती उत्पादनाची प्रक्रिया करणारे उद्योग ग्रामीण भागात निर्माण करणे आवश्यक आहे. शेती वरील भार कमी होणार नाही. गावागावात प्रत्येकाला काम मिळेल अशा शेतीपूरक व्यवसाय दयावे लागेल. शेतकऱ्यांना पूरक उत्पन्नाची व्यवस्था करणे अत्यंत गरजेचे आहे. शहरी भागातून आलेल्या नागरिकांनी नोकरीचा मागे न लागता पुन्हा नव्या उत्साहाने शेती करावी सरकारकडे अपेक्षा करावी. कारण जगात संकटे आली ती सर्व औद्योगिकरणामुळे आली आहेत. अवेळी पाऊस, चक्रीवादळ, औद्योगिकरणामुळे पोहोचली आहेत. शशहरी भागातून गावात परत आलेल्या लोकांनी शेती करावी. शेतकऱ्यांची आत्महत्या करण्याची काही गरज नाही. यापूर्वीच्या काळात पैशाला किंमत असे नाही मात्र गावातील शेतकरी स्वावलंबी व स्वतंत्र असून तोच राजा होता. इंग्रजांनी आपल्या काळात शेतीचे व्यापारीकरण केले होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाले. पूर्वी शेतात टाकणारे बियाणे घरीच तयार करीत होते. शेतीसाठी खताचा उपयोग करून सुपीक बनविली होती. शेतकरी हजारो वर्षापासून भूकेसाठी अन्नाचे उत्पादन घेत होते. हरित क्रांतीनंतर बाजार डोळ्यासमोर ठेवून शेतकऱ्यांना विविध प्रलोभने दाखवून उत्पादन घेण्यास प्रवृत्त केले यातूनच बाजारासाठी धान्य घेण्याची कल्पना वाढीस लागली. त्यामुळे त्यातून दुप्पट–तिप्पट उत्पादन मिळविण्याची महत्त्वाकांक्षा लागली.

पूर्वी उदरनिर्वाहासाठी शेतकरी अन्नधान्याचे उत्पादन घेणे हाच उद्देश होता. आता कोरोना काळात शेतकऱ्यांनी त्याला आधार देऊन जगविले हे विसरता येत नाही. तर संपूर्ण माणव समाज अन्नाशिवाय जगू शकत नाही हे वास्तव आहे. तरी शहरी भागात शेतकऱ्यांचा वस्तू घेताना ग्राहक भाव पाडून मागतात. व्यापाऱ्यांकडून घेताना मागेल तेवढे किंमत मोजून देतात. येथेच खरे शेतकऱ्यांचे प्रचंड शोषण होताना दिसत आहे. भौतिक साधना द्वारे मानव उदरनिर्वाह करू शकत नाही मात्र त्यांना जगवणारे मूलभूत गरज असलेले अन्न पिकवणारे शेतकरी आत्महत्या करतात. या शेतकऱ्यांनी रासायनिक बी–बियाणे खते आणि औषधांचा वापर कमी करून शक्य झाल्यास बंद करून पर्यावरण पूरक शेती करायला हवीत उत्पादन कमी असले तरी चालेल कारण त्यामुळे खर्च कमी येईल आणि कर्ज काढण्याचा गरज भासणार नाही. तर कमी लागत खर्चात जास्त उत्पादन कसे घ्यावे अशी व्यवस्था निर्माण होणे अतिशय आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

शेतकऱ्यांना कर्ज देणे हाच त्यावरील एकमेव उपाय नाही. शेतकऱ्यांची आर्थिक सुधारणा करावयाची असेल तर शेतकऱ्यांना कमीतकमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करूण द्यावेत. शिवाय त्यांच्या मालाला योग्य भाव द्यावा. त्यांच्या मालाची खरेदी करण्याची व्यवस्था करावी. शेतीच्या सिंचनाची व्यवस्था करण्यात यावी. शेतकऱ्यांच्या मुलांना उच्च शिक्षण मोफत देण्यात यावे. अशी व्यवस्था केल्याशिवाय शेतकरीवर्ग सुखी व समृद्ध जीवन जगू शकणार नाही त्यांच्या मुलांना पात्रतेनुसार नोकरी दिली जावीत. शेतकरी संघटना त्यांच्यासाठी योग्य पध्दतीने कार्य करत नाही. शेतकरी संघटनेचे नेते पक्षाच्या दावणीला बांधले आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे शेतकरी वर्ग हा संघटित नाही. सरकारी नोकर वर्गाची स्थिती बघितली तर त्यांच्या

अन्याय होताना दिसणार नाही. ते लोक संप या सारखे मार्ग अवलंबून सरकारला वेठीस धरतात व मागण्या पदरात पाडून घेतात. शेतकरीवर्ग संघटित नसल्यामुळे त्यांना आपल्या मागण्या मान्य करून घेता येत नाही. ही वस्तुस्थिती आहे. कारण शेतकरी मजुरांना नेता किंवा पुढारी मिळत नाही आणि असले तर तो शेतऱ्यांसाठी योग्य काम करत नाही. शेतऱ्यांसाठी अनेक कायदे अस्तित्वात आहेत. मात्र त्या कायदयांची योग्य प्रकारे अमलबजावणी होतांना दिसत नाही. शेतमजुरांना कमी मजुरीत काम करावे लागणात आहे.

संदर्भ

1. प्राचार्य राणा गायधनी वाघः प्राचीन भारताचा इतिहास, पुणे; के सागर पब्लिकेशन.
2. डॉ. जयसिंग पवारः हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, कोल्हापूर;फडके प्रकाशन
3. दैनिक लोकमत संपादकीय दिनांक 05. 2020
4. दैनिक लोकमत संपादकीय दिनांक 30 5 2020